प-१.

# बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र.एमडीएफ/ओडी/917/जन दि.13.7.2018

विषय- विविध उत्सवांदरम्यान पदपथांवर उभारण्यात येणा-या मंडप परवानगीबाबत

संदर्भ - 1) मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. 173 / 2010
दि.13.3.2015, 24.6.2015, 17.7.2015 आणि 10,11,12 व
16 ऑगस्ट 2016 वर पारित केलेले आदेश.
2) बृहन्मुंबई महानगरपालिकेचे धोरण क्र. अति.आयुक्त/पूउ/4462/III
दि. 24.7.2015.
3) परिपत्रक क्र. एमडीएफ/ओडी/3098/जन दि.30.01.2017
4) परिपत्रक क्र. एमडीएफ/ओडी /418/जन दि.12.5.2017

मा.उच्च न्यायालयाने विविध उत्सवांदरम्यान पदपथांवर उभारण्यात येणा-या मंडपांबाबत जनहित याचिका 173/2010 यामध्ये वेळोवेळी विविध आदेश पारित केलेले आहेत. सदर आदेश वेळोवेळी पारित केलेल्या उपरोक्त परिपत्रकांव्दारे संबंधितांना अवगत करण्यात आले आहेत.

मा.उच्च न्यायालयाने पारित केलेल्या आदेशांचे काटेकोरपणे पालन व्हावे व अनधिकृत मंडपांची उभारणी होऊ नये यासाठी मंडप परवानगी प्रक्रिया संगणकीय प्रणालीव्दारे करण्याचे नियोजित करण्यात आले आहे. सदर प्रणाली दि.15.7.2018 रोजी कार्यान्वित करण्याचे नियोजित आहे.

सर्व सहा.आयुक्तांना याव्दारे निर्देश देण्यात येत आहेत की, महापालिकेतर्फे परवानगी प्राप्त झाल्यानंतरच मंडपांची उभारणी होईल व उभारण्यात आलेले मंडप सर्वतोपरी महापालिकेतर्फे देण्यात आलेल्या परवानगीला अनुसरुनच आहेत याची खबरदारी घेण्याचे निर्देश सर्व संबंधितांना देण्यात यावेत. त्याचप्रमाणे, विनापरवाना मंडप उभारले जाणार नाहीत याची खबरदारी विभाग कार्यकारी अभियंता यांच्या अधिपत्याखाली स्थापन करण्यात आलेल्या मंडप तपासणी पथकाने घ्यावी. विनापरवाना मंडपांची उभारणी झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित विभाग कार्यकारी अभियंता यांना व्यक्तिशः जबाबदार धरण्यात येईल.

सदर आदेश तात्काळ प्रभावित होतील. सदर परिपत्रक सर्व सणांसाठी लागू राहील.

12/7/18

उपायुक्त (परि-2)

D:backup d/vap/Dict/Dict.3